लोकमत

सुधीर कोठारी : प्रतिक्विंटल ७ हजार ५३० रुपये भाव

# हिंगणघाट बाजार समितीत कापसाच्या दराने गाठला उच्चांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगणघाट :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ही राज्यात कापसाचा हब म्हणून ओळखली जाते. मंगळवारी कापूस यार्डमध्ये ३७५ वाहनांतून आलेल्या साडेसहा हजार क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली असून खुल्या लिलावात प्रतिक्विंटल ७ हजार ५३० रुपये सर्वाधिक दर देण्यात आला, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी पत्रपरिषदेत दिली.


खुल्या लिलावामध्ये चांगल्या प्रतीच्या कापसाला खरेदीदाराकडून होत असलेली मागणी आणि त्यामुळे खरेदीदारांमध्ये वाढलेली स्पर्धा यातून कापसाच्या दरातही वाढ होत आहे. हिंगणघाटच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कापसावर प्रक्रिया करणाऱ्या जिनिंग व टेक्सटाईल्स पार्कची उभारणी झाल्याने संबंधित प्रकिया धारकांकडून कच्च्या कापसाची मागणी होत आहे. ही मागणी दिवसागणिक वाढत असल्याने कापसाला स्पर्धात्मक दर मिळत आहे. बाजार समितीकडून शेतकऱ्यांच्या तक्रारींचे शतप्रतिशत निराकरण, तत्काळ पेमेंटची सुविधा, खुल्या लिलावाद्वारे शेतमालाची विक्री होत असल्याने शेतकऱ्यांचाही विश्वास वाढत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीकडूनही शेतकऱ्यांसाठी विविध सोयी, सवलती उपलब्ध करुन दिल्या जात आहे. त्यामुळे शेतकरीही समाधानी दिसत आहे. त्यामुळे उत्पादकांनी या बाजार समितीच्या आवारातच शेतमालाची विक्री करावी, काही अडचणी असल्यास तातडीने समितीकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहनही सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी यावेळी केली.

या पत्रपरिषदेला बाजार समितीचे उपसभापती हरीश वडतकर, संचालक मधुसुदन हरणे, मधुकर डंभारे, प्रफुल्ल बाडे, उत्तम भोयर, ओमप्रकाश डालिया, अशोक उपासे, राजेश मंगेकर, डॉ. निर्मेश कोठारी, घनश्याम येरलेकर, पंकज कोचर, संजय कातरे. शुभ्रबुद्ध कांबळे, हर्षद महाजन, धनेश्वर लोणारे, माधुरी चंदनखेडे, नंदा चांभारे यांच्यासह सचिव टी.सी. चांभारे यांची उपस्थिती होती.

## या हंगामात ६ लाख ९३ हजार क्विंटल कापसाची आवक...

- या बाजार समितीत सन २०२३-२०२४ या हंगामांतर्गत १ नोव्हेंबर २०२३ रोजी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला होता. तेव्हापासून आतापर्यंत ६ लाख ९३ हजार क्विंटल कापसाची आवक झाली आहे. दर दिवसाला तिनशे ते साडेतिनशे वाहनांची गर्दी राहत असून त्यातून सहा ते सात क्विंटल किंवा त्यापेक्षाही जास्त कापसाची आवक होत आहे. ती या दिवसात आणखीच वाढली आहे.



कोल्हापूर, बुधवार, २८ फेब्रुवारी २०२४

# पोलिस दलात तृणधान्याचा वापर वाढण्यास चालना देणार

## विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारे यांची माहिती

**अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा**

कोल्हापूर : पोलिस दलातील कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या कँटीनमध्ये तसेच त्यांच्या दैनंदिन आहरामध्ये आवश्यकतेनुसार मिलेटचा (तृणधान्य) वापर वाढविण्यासाठी चालना देणार असल्याची माहिती विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारे यांनी दिली.

कोल्हापुरातील व्ही. टी. पाटील स्मृतिभवन येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व नाबार्ड, कोल्हापूर आयोजित मिलेट (तृणधान्य) महोत्सवात घेण्यात आलेल्या पाककृती स्पर्धेतील बक्षीस वितरण समारंभात फुलारे बोलत होते.

स्पर्धेत ३३ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धकांचा श्री. फुलारे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. निहारिका शिंदे, विमल सूर्यवंशी, माधुरी पाटील, संदीप खाते, पद्मा माने यांनी यश मिळवले. पाककृती स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, डॉ. प्रतिभा ठोंबरे, डॉ. सुनील कुमार व सूर्यप्रभा भोसले, पोलिस निरीक्षक तानाजी सावंत, राजारामपुरीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, उप सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी काम पाहिले.

# मिलेट महोत्सवात १२ लाखांची उलाढाल

## ग्राहकांचा प्रतिसाद; महोत्सवाचा आज शेवटचा दिवस

**कोल्हापूर :** कृषी पणन मंडळ विभाग व नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या तृणधान्य (मिलेट) महोत्सवात गेल्या ३ दिवसांत १२ लाख रुपयांची उलाढाल झाली.

विभागीय कृषी सहसंचालक बसवराज बिराजदार यांच्या उपस्थितीत मंगळवारचा समारोप सोहळा होणार आहे. या कार्यक्रमात प्रशस्तिपत्रांचे वाटप, सत्कार आणि मिलेट महोत्सवाचे महत्त्व आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गावरान ज्वारी, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील नाचणी पदार्थ, रायपूर येथील विशेष पाककृती महोत्सवातील आकर्षण ठरत आहे. ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या आदी नावीन्यपूर्ण असंख्य उत्पादने या महोत्सवात उपलब्ध करून देण्यात आली.

...पूर, सोमवार, २६ फेब्रुवारी, २०२४

सकाळ

# तृणधान्य वापरासाठी पोलिसांना प्रोत्साहित करू : सुनील फुलारी

## मिलेट महोत्सव : स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : मानवी आरोग्यास तृणधान्यातील सत्वांची आवश्यकता असून ते घेण्यासाठी प्रोत्साहनाची गरज आहे. पोलिसांनी आपल्या जेवण व नाश्त्यात तृणधान्याचा वापर करावा, यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाईल, असे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी आज येथे केले.

राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृती भवन येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व नाबार्ड, कोल्हापूर यांच्यातर्फे आयोजित तृणधान्य (मिलेट) महोत्सवाला भेट दिल्यानंतर ते बोलत होते. यावेळी कृषी पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, पोलिस निरीक्षक तानाजी सावंत, राजारामपुरी पोलिस ठाण्याचे निरीक्षक अनिल तनपुरे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृती भवन येथे सुरू असलेल्या मिलेट महोत्सवाला रविवारी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी भेट दिली. या वेळी डॉ. सुभाष घुले उपस्थित होते.

महोत्सवात रविवारी विविध स्पर्धेतील विजेत्यांना फुलारी यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यामध्ये पाककृती स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह वितरित करण्यात आले. दरम्यान महोत्सवाला नागरिकांकडून प्रतिसाद मिळत असून गावरान ज्वारी, कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातील नाचणी पदार्थ आणि रायपूर येथील विशेष पाककृती महोत्सवातील आकर्षण ठरत आहे. फुलारी म्हणाले, "पोलिस दलातील कँटीनमध्ये तसेच त्यांच्या दैनंदिन आहारामध्ये आवश्यकतेनुसार तृणधान्याचा वापर वाढविण्याबाबत चालना दिली जाईल."

# तृणधान्याचे क्षेत्र वाढण्याची गरज

## जिल्हाधिकारी अमोल येडगे : 'कोल्हापूर मिलेट महोत्सवा'ला सुरुवात

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : तृणधान्याचे गेल्या वीस वर्षांपासून घटलेले क्षेत्र व उत्पादन वाढण्याची गरज आहे. त्यासाठी राबविलेला 'कोल्हापूर मिलेट महोत्सव' स्तुत्य आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी शनिवारी येथे केले.

राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृती भवन येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर विभागीय कार्यालय व नाबार्ड, कोल्हापूर यांच्यातर्फे आयोजित 'कोल्हापूर मिलेट महोत्सव-२०२४'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पणन मंडळ, कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, व्यवस्थापक जितेंद्र शिंदे, जिल्हा समन्वयक तात्यासाहेब भुजबळ, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी आशुतोष जाधव, शेतकरी संघाचे संचालक दत्ताजीराव वारके, शेती उत्पन्न बाजार समितीचे सभापती भारत पाटील-भुयेकर, सचिव जयंत पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृतिभवन येथे 'मिलेट महोत्सवा'चे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. सुभाष घुले, आशुतोष जाधव, दत्ताजीराव वारके, तात्यासाहेब भुजबळ, जितेंद्र शिंदे उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी येडगे यांनी महोत्सवातील स्टॉलला भेटी देऊन स्टॉलधारकांना शुभेच्छा दिल्या. शनिवारपासून (ता. २४) मंगळवार (ता. २७) पर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत हा महोत्सव सुरू राहणार आहे.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, "तृणधान्य हे शरीरासाठी पौष्टिक असून, ते पारंपरिक पद्धतीने शेतकऱ्यांकडून पिकविले जाते. त्यामुळे याचा वापर सर्व वयोगटासाठी महत्त्वपूर्ण आहे."

डॉ. सुभाष घुले म्हणाले, "विक्री व्यवस्थेतील मध्यस्थ न ठेवता शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे."

### गोवा, छत्तीसगडमधील उत्पादन, पदार्थांची थेट विक्री

कोल्हापूरसह राज्यातील विविध भागांसह गोवा व छत्तीसगड येथून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियेमध्ये काम करणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट-अप कंपन्या सहभागी झाल्या आहेत. महोत्सवामध्ये ४५ स्टॉल्स असून, ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सावा, राजगिरा, कुटकी, कोडे अशा तृणधान्यांपासून तयार करण्यात आलेले पदार्थ, ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, राजगिऱ्याची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

### रायपूरचा स्टॉल लक्षवेधी

■ या महोत्सवातील रायपूर (छत्तीसगड) येथील शेतकरी कृष्णा मोहन यांचा स्टॉल लक्षवेधी आहे. तृणधान्याचे पदार्थ प्रत्येकाच्या ताटात गेले पाहिजे, या उद्देशाने ते विविध रेसीपी बनवत आहेत. त्यांनी बनविलेल्या बिर्याणी, मसालेभात, शिरा, उप्पीट खरेदी करून नागरिकांकडून आस्वाद घेतला जात होता.

पुढारी. दि. 25/02/2024

# तृणधान्याच्या उत्पादनात वाढ होण्याची गरज

## जिल्हाधिकारी येडगे; मिलेट महोत्सवाचा प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर जिल्हा हा ऊस आणि भात पिकांच्या उत्पादनात आघाडीवर आहे. जिल्ह्यात नाचणी, ज्वारी, बाजरी, राळा, वरी, राजीगरा या तृणधान्यांचे उत्पादन घेतले जाते. तृणधान्यापासून तयार केलेले पदार्थ पोषक ठरत असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. यासाठी जिल्ह्यात तृणधान्य उपलब्ध होणे गरजचे आहे. त्यासाठी तृणधान्य उत्पादन आणि उत्पादकता वाढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

कृषी पणन मंडळाच्या कोल्हापूर विभागाच्या वतीने ताराराणी विद्यापीठ परिसरातील व्ही. टी. पाटील स्मृतिभवनमध्ये आयोजित मिलेट महोत्सवाच्या प्रारंभप्रसंगी येडगे बोलत होते. महोत्सवामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, नांदेड, सोलापूर जिल्ह्यांतील शेतकरी, उत्पादक कंपन्या, बचत गट सहभागी झाले आहेत. छत्तीसगड व गोवा येथील शेतकरीही सहभागी झाले आहेत.

माणसाच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले घटक हे तृणधान्यातून मिळत असतात. या तृणधान्यापासून तयार करण्यात आलेले विविध पदार्थ या महोत्सवात कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांना पाहता येणार आहेत. नागरिकांनी याचा लाभ घेऊन मिलेटचे महत्त्व जाणून घ्यावे, असे आवाहन या महोत्सवाचे आयोजक व कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले. आभार नाबार्डचे व्यवस्थापक जितेंद्र शिंदे यांनी मानले.



**कोल्हापूर : कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित मिलेट महोत्सवाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे. शेजारी डॉ. सुभाष घुले, आशितोष जाधव व इतर. (छाया : अर्जुन टाकळकर)**

कार्यक्रमास येथील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, बाजार समितीचे सभापती भारत पाटील-भुयेकर, सचिव जयवंत पाटील, नाबार्डचे विभागीय उपसरव्यवस्थापक आशितोष जाधव, शेतकरी संघाचे संचालक दत्ताजीराव वारके, मार्केट यार्डातील अडत दुकानदार, शेतकरी, कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

महासत्ता एकच आवृत्ती

# तृणधान्य हे शरीराला पौष्टिक व आरोग्यासाठी लाभदायक

## जिल्हाधिकारी अमोल येडगे

कोल्हापूर,ता.२४ (प्रतिनिधी)–

तृणधान्य हे शरीराला पौष्टिक असून पारंपरिक, नैसर्गिक आणि आरोग्यासाठी लाभदायक असून तृणधान्याचा वापर सर्व वयोगटासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांचे विभागीय कार्यालय कोल्हापूर व नाबार्ड कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मिलेट महोत्सव २०२४' चे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कोल्हापूर विभागाचे उप सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी आशुतोष जाधव आदी उपस्थित होते.

तृणधान्य हे शरीराला पौष्टिक असून ते पारंपरिक पद्धतीने शेतकरी पिकवतो, खातो.

नैसर्गिकरीत्या तयार होणाऱ्या तृणधान्याचा फायदा लहान, तरुण तसेच वयोवृद्ध लोकांना मोठ्या प्रमाणात होतो. सध्या सर्वांची आहारपद्धती बदललेली आहे. त्याच अनुषंगाने तृणधान्य(मिलेट) चे महत्व सर्वांना कळावे म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. या प्रदर्शनाचा कोल्हापूरकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री.येडगे यांनी केले.

प्रास्ताविक डॉ. सुभाष घुले यांनी केले. कोल्हापूर येथे दि. २७ फेब्रुवारी अखेर मिलेट महोत्सव सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत असणार आहे. राज्याच्या विविध भागातून तृण धान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियेमध्ये काम करणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी झाल्या आहेत. महोत्सवामध्ये ४५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून विक्री साठी उपलब्ध आहेत.

MAHASATTA EPAPER
Kolhapur, Sangli, Satara, Belgaum Edition.
Date : 25-02-2024 Page No. - Mahasatta_7

लोकमत

अमोल येडगे : मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

# भरडधान्य सर्व वयोगटांच्या आरोग्यासाठी लाभदायक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सध्या धावपळीच्या युगात प्रत्येकाचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. सर्वच वयोगटातील लोकांच्या आरोग्यासाठी भरडधान्य लाभदायक असून त्याचा वापर वाढला पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय कोल्हापूर व नाबार्ड कोल्हापूर यांच्या वतीने व्ही. टी. पाटील सभागृहात शनिवारपासून आयोजित केलेल्या 'मिलेट महोत्सव २०२४' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, भरडधान्याची दखल जागतिक स्तरावर घेतल्याने त्याचे मार्केटही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पणनचे कोल्हापूर विभागीय उप सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले म्हणाले, युनोने २०२३ मिलेट वर्ष जाहीर केल्यानंतर अशाप्रकारचे महोत्सव मिलेटच्या जनजागृतीसाठी केले जातात. कोल्हापुरात मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच मिलेट महोत्सव साजरा होत असून महाराष्ट्रासह छत्तीसगड, गोवा येथून स्टॉलधारक सहभागी झाले आहेत. नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी आशुतोष जाधव यांनी आभार मानले.



पणन मंडळ, विभागीय कार्यालय कोल्हापूर व नाबार्ड कोल्हापूर यांच्या वतीने व्ही. टी. पाटील सभागृहात शनिवारपासून आयोजित केलेल्या 'मिलेट महोत्सव २०२४' चे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'नाबार्ड'चे आशितोष जाधव, डॉ. सुभाष घुले आदी उपस्थित होते.

## मंगळवारपर्यंत महोत्सव सुरु राहणार

विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळत आहे. हा महोत्सव मंगळवार (दि. २७) पर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत चालू राहणार आहे.

## महोत्सवात हे मिळणार...

महोत्सवामध्ये ४५ स्टॉल उपलब्ध असून, ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा अशी विविध तृणधान्ये, यापासून तयार करण्यात आलेले पदार्थ, ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण असंख्य प्रकारची उत्पादने थेट उत्पादकांकडून विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

# ईगल न्यूज

• वर्ष 3 रे • संपादिका ~सौ.शालन कोळेकर
• https://eaglenews.co.in • संपर्क~9422420611 • रजि.नं.M.H.28-0005304

मुंबई , महाराष्ट्र २५ फेब्रुवारी २०२४


## पारंपरिक, नैसर्गिक आणि आरोग्यासाठी लाभदायक तृणधान्याचा सर्व वयोगटासाठी वापर व्हावा ~जिल्हाधिकारी अमोल येडगे





पारंपरिक, नैसर्गिक आणि आरोग्यासाठी लाभदायक तृणधान्याचा सर्व वयोगटासाठी वापर व्हावा -जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी स्पष्ट केले .व्ही..पाटील स्मृती भवन येथे 'मिलेट महोत्सव 2024' ची सुरुवात तृणधान्य हे शरीराला पौष्टिक असून ते पारंपरिक पद्धतीने शेतकरी पिकवतो, खातो. नैसर्गिकरीत्या तयार होणाऱ्या तृणधान्याचा फायदा लहान, तरुण तसेच वयोवृद्ध लोकांना मोठ्या प्रमाणात होतो. सध्या सर्वांची आहारपद्धती बदललेली आहे. त्याच अनुषंगाने तृणधान्य(मिलेट) चे महत्व सर्वांना कळावे म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने सन 2023 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. अशा या पारंपरिक, नैसर्गिक आणि आरोग्यासाठी लाभदायक तृणधान्याचा वापर सर्व वयोगटासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. त्यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांचे विभागीय कार्यालय कोल्हापूर व नाबार्ड कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'मिलेट महोत्सव 2024' चे उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कोल्हापूर विभागाचे उप सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी आशुतोष जाधव आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी अमोल येडगे यावेळी म्हणाले की, गरिबांचे धान्य म्हणून असलेली तृणधान्याची ओळख आता पुसलेली आहे. नैसर्गिक पद्धतीने शेतकरी तृणधान्य पिकवून अशा प्रकारच्या विविध मिलेट महोत्सवातून त्याची विक्री करीत आहेत. तृणधान्याची दखल जागतिक स्तरावर घेतल्याने त्याचे मार्केटही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी भरडधान्याचा अधिक वापर सर्वांनी करावा. तसेच प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमात, पाहुण्यांच्या स्वागतावेळी तृणधान्यापासून तयार केलेले खाद्यपदार्थ वाटप करावेत आणि यासाठी कृषी विभागाने पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी यांनी सर्व स्टॉलला भेटी देऊन विविध पदार्थ चाखून पाहिले व स्टॉलधारक शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले. ते म्हणाले, युनोने 2023 मिलेट वर्ष जाहीर केल्यानंतर अशा प्रकारचे महोत्सव मिलेटच्या जनजागृतीसाठी केले जात आहेत. कोल्हापूर येथे अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच मिलेट महोत्सव साजरा होत आहे. याठिकाणी महाराष्ट्र राज्यासह छत्तीसगड, गोवा येथून स्टॉलधारक सहभागी झाले आहेत, याचा फायदा कोल्हापूरकरांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरुवात फित कापून व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुयोग टकले व आभार जिल्हा विकास अधिकारी आशुतोष जाधव यांनी मानले. मिलेट महोत्सवाची जनजागृती करण्यासाठी विद्यार्थी बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती, जिल्हाधिकारी यांनी झेंडा दाखवून तिला मार्गस्थ केले.मिलेट महोत्सवातील आकर्षण विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा या महोस्तवांचा प्रमुख उद्देश आहे. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. कोल्हापूर येथे दि. 24 ते 27 फेब्रुवारी अखेर मिलेट महोत्सव सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत असणार आहे. राज्याच्या विविध भागातून तृण धान्य उत्पादक, तृण धान्य प्रक्रिये मध्ये काम करणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी झाल्या आहेत. महोत्सवामध्ये 45 स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले असुन, ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा असे विविध तृणधान्ये, यापासुन तयार करण्यात आलेले पदार्थ, ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नाविण्यपूर्ण अशी असंख्य प्रकारची उत्पादने थेट उत्पादकांकडून विक्री साठी उपलब्ध आहेत. तसेच मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्य विषयक महत्व या विषयी नामांकित तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, मिलेट आधारित महिलांसाठी पाककृति स्पर्धा, खरेदीदार-विक्रेते संमेलन असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे.

पुढारी इन्फोग्राफिक्स दि.22/02/24

# यंदा आंबा निर्यात जाणार 25 हजार मेट्रिक टनांवर




रायगड : जयंत धुळप

गतवर्षी भारतातून ३७८ कोटी ७९ लाख रुपये किमतीचा २२ हजार ९६३ मेट्रिक टन आंबा परदेशात निर्यात करण्यात आला. कोरोनाच्या दोन ते तीन वर्षांच्या खंडानंतर इतक्या मोठ्या प्रमाणात आंबा निर्यात झाला. यंदादेखील २५ हजार मेट्रिक टन आंबा निर्यात होणे अपेक्षित असल्याचे महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक व बागायतदार महासंघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दैनिक 'पुढारी'शी बोलताना सांगितले.

**निर्यातीचे आकडे**

| वर्ष | रक्कम (रुपयांत) | निर्यात मे. टनमध्ये |
|---|---|---|
| २०१९-२० | ४०० कोटी २१ लाख | २९,८८४ |
| २०२०-२१ | २७१ कोटी ८८ लाख | २१,०३४ |
| २०२१-२२ | २८९ कोटी ७० लाख | २६,३१२ |
| २०२२-२३ | ३७८ कोटी ७९ लाख | २२,९६३ |

▪ लहरी हवामानाचा परिणाम यंदाही कोकणात आंबा बागायतीला बसला आहे. परिणामी नव्याने आलेल्या मोहोराचे **आंबे यंदा** उशिरा हाती येणार आहेत. स्थानिक बाजारपेठेतील आंब्याचे भाव खाली येऊ लागले की आंबा निर्या**तीत** वाढ होणे हे आजवरचे चित्र आहे. परिणामी एप्रिल अखेर आंबा निर्यातीस प्रारंभ होणे अपेक्षित आहे.



▪ महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या हापूस व केशर या निर्यातीच्या दृष्टीने दोन महत्त्वाच्या जाती आहेत. आयातदार देशांच्या निकषांनुसार आवश्यक सुवि**धांची** उपलब्धता, आंतरराष्ट्रीय विमानतळ व बंदर या महाराष्ट्रातील सर्व उपलब्ध सुविधा हे एक महत्त्वाचे **बलस्थान** आहे. भारतातून बंदर समुद्रमार्गे व हवाईमार्गे आंबा निर्यात होते.

## आंब्याच्या पल्पची निर्यात

आंब्याच्या पल्पची निर्यातदेखील मोठ्या प्रमाणात होत आहे. ही निर्यात वाढविण्यासाठी दर्जेदार उत्पादनाबरोबरच त्यासाठी लागणाऱ्या गुणवत्ता प्रमाणकाकडेही तेवढेच लक्ष द्यावे लागते. भारताच्या जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यत्वामुळे आणि कृषी क्षेत्राच्या जागतिक व्यापारामधील समावेशामुळे फळांच्या निर्यातीसाठी चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत. विशेषत: आंब्याची मोठ्या प्रमाणात झालेली लागवड आणि उत्पादन पाहता या फळांच्या निर्यातीस चांगला वाव राहणार आहे.

## चव चाखली जाते जगभर...

महाराष्ट्रातील हापूस आणि केशर आंब्यांची चव जगभर चाखली जाते व या दोन्ही जातींच्या आंब्यांना भौगोलिक निर्देशांक (जीआय) मानांकन मिळालेले आहे. कोकणातील हापूस आंब्याचा हंगाम मार्चमध्ये सुरू होत असला, तरी स्थानिक बाजारपेठेत आंब्याला चांगले दर प्राप्त होत असल्यामुळे निर्यातीचा हंगाम मात्र एप्रिलच्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात सुरू होतो व साधारणपणे मे अखेरपर्यंत चालू राहतो, तर केशर आंब्याचा हंगाम मात्र मेपासून ते जूनपर्यंत असतो.

# केळीच्या निर्यातीकरिता शेतकरी उत्पादक कंपन्यांनी भर द्यावा : दिनेश डागा

## मॅग्रेट प्रकल्प अंतर्गत केळी उत्तम कृषी पद्धती गॅप प्रशिक्षणाचे अंजनगाव सुर्जी येथे आयोजन



अंजनगावसुर्जी दि. २ : वातावरण बदलाचे परिणाम मानवी जीवनाबरोबर कृषी आणि कृषी उत्पादनावर सुद्धा होत आहेत. कृषीचे उत्पादन आणि विक्री हे सूत्र आता कालबाह्य ठरत असून या दोहोंच्या मध्ये प्रक्रिया व दर्जेदार मालाची निर्यात हा एक मोठा घटक समाविष्ट झाला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या शेतकऱ्यांचा माल अल्प दरात विकत घेऊन त्याचे ब्रँडिंग आणि मार्केटिंग मोठ्या प्रमाणात करून मोठा नफा मिळवीत आहेत. मात्र उत्पादक शेतकरी अजूनही आहे त्या स्थितीत आहे याचा परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिकतेवर होत आहे. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याने वर्तमानात स्वतःच्या शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करून मालाचे उत्पादन, प्रक्रिया, विक्री आणि निर्यात ही मूल्य साखळी विकसित करणे आवश्यक आहे. शासन केळी उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता अनेक योजना राबवत असून शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना सर्व व्यवहार कुशलता पूर्वक हाताळता यावेत याकरिता मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात आहेत. या प्रशिक्षणांचा लाभ घेऊन केळीच्या निर्यातीकरिता शेतकरी उत्पादक कंपन्यांनी भर द्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे विभागीय व्यवस्थापक तथा मॅग्रेटचे उप-सरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी केले ते आशियाई डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस प्रकल्प (मॅग्रेट) व कृषि विज्ञान केंद्र, दुर्गापुर (बडनेरा) जिल्हा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अंजनगाव सुर्जी येथे आयोजित केळी- उत्तम कृषिपद्धतीबाबत प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि म्हणून ॲग्रिबिझनेस एक्स्पर्ट (मॅग्रेट) अमरावती चे निलेश वानखडे, सहा. प्रा. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला चे डॉ. राजेंद्र वानखडे, मॅग्रेट चे प्रकल्प अंमलबजावणी सहायक कक्ष अधिकारी निखिल धानोरकार, मॅग्रेट च्या सामाजिक आणि जेंडर ऑफिसर मयूरी मिसाळ, कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूरचे उद्यानविद्या विषय विशेषज्ञ प्रफुल्ल महल्ले, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र, तळेगाव दाभाडे, पुणे चे प्राचार्य संजय पारडे, अन्न तंत्रज्ञान विभागाचे कार्यक्रम सहायक राहुल घोगरे, जैन ठिबक कंपनीचे वितरक श्रीकृष्ण पेढेकर तसेच वीर हनुमान केळी टिश्यू कल्चर युनिटचे संचालक दिनकर जायले आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना दिनेश डागा म्हणाले की ६०% अनुदान २०% बँक कर्ज आणि केवळ २०% कंपनीचे स्वतःचे भांडवल असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. एक हजार कोटीचा हा प्रकल्प असून २०२६-२७ पर्यंत हा प्रकल्प चालणार आहे. शेतकरी कंपन्यांना या प्रकल्पाची संपूर्ण माहिती मिळावी याकरिता अशा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जात असून या प्रशिक्षणातून शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना प्रकल्पाची उभारणी करताना येणाऱ्या अडचणी यावर मात्र मात करणे मालाचे ब्रँण्डिंग, प्रोसेसिंग, मार्केटिंग आणि निर्यात कशी करावी याचे संपूर्ण मार्गदर्शक मार्गदर्शन केले जाणार असल्याचेही ते म्हणाले.

आपल्या तांत्रिक मार्गदर्शनात डॉ. राजेंद्र वानखडे यांनी, उत्तम कृषि पद्धती अंतर्गत केळीच्या लागवडी पासून ते निर्यातीपर्यंत कराव्या लागणार्या सर्व बाबींची मुद्देसूद माहिती दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवीण वानखडे यांनी केळी निर्यातीकरिता ब्रॅण्डिंग, प्रोसेसिंग कशी करावी त्याच बरोबर निर्यातीकरिता विविध ठिकाणी असणार्या सुविधा आणि देश-विदेशातील निर्याती संदर्भातील प्रमाणके यांची विस्तृत माहिती उपस्थित शेतकर्यांना दिली तर सोशल अँड जेंडर ऑफिसर मयूरी मिसाळ यांनी शेतीमध्ये काम करीत असतांना स्त्री ही पुरुषाला खांद्याला खांदा लावून काम करते बर्याचवेळा पुरुषापेक्षाही जास्त कामे स्त्री करीत असते अशा स्त्रीला पुरुषाप्रमाणेच समान अधिकार असावा असे प्रतिपादन त्यांनी केले, प्राचार्य संजय पारडे यांनी फलोत्पादनाच्या प्रशिक्षणाविषयी मौलिक मार्गदर्शन केले तर राहुल घोगरे यांनी निर्यात केलेल्या केळी व्यतिरिक्त उरलेल्या केळीची कशा पद्धतीने विविध प्रक्रिया उत्पादने घ्यावीत याविषयी सखोल मार्गदर्शन केले, तसेच केळीची निर्यात करणारे प्रवीण नेमाडे यांनी शेतकर्यांचा माल निर्यात करण्याकरिता लागणारे सर्वोतोपरी मार्गदर्शन करण्याची ग्वाही दिली.

आपल्या प्रास्ताविकात नीलेश वानखडे यांनी मॅग्रेट प्रकल्पाची माहिती दिली व या प्रकल्पाचा केळी उत्पादक शेतकरी व महिलांनी या संधीचा फायदा घ्यावा असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रफुल्ल महल्ले यांनी केले तर राहुल घोगरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला अंजनगाव सुर्जी व अचलपुर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकरी तसेच शेतकरी उत्पादक संघाच्या महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सचिन पिंजरकर, वैभव मंडपे, धीरज राठी यांनी विशेष परिश्रम घेतले.

पुण्य नगरी
दि. 02/02/2024

# 'कृषी पणन'मार्फत उद्या मिलेट महोत्सव

**कोल्हापूर :** कृषी पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेतून २४ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत 'मिलेट महोत्सव' चे 'व्ही. टी.पाटील स्मृतीभवन, राजारामपुरी येथे आयोजन केले आहे. याचे उद्धघाटन दि. २४ रोजी स. ११ वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासुन तयार केलेला ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील, अशी माहिती कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले व नाबार्डचे उपसरव्यवस्थापक अशुतोष जाधव यांनी केले आहे.

पुढारी दि. 02/02/2024



अमेरिकन निरीक्षक लुईस यांनी निर्यातीच्या डाळिंबाच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला. त्यावेळी उपस्थित मान्यवर.

# पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस डाळिंब निर्यात

- विमान वाहतुकीद्वारे १३४४ किलो डाळिंब रवाना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय डाळिंबामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव आढळून आल्यामुळे अमेरिकेने आयात बंदीचा घातलेला निर्णय काही अटींच्या अधिन राहून उठविण्यात आला आहे. त्यानुसार मुंबईतील राज्य कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधेचा वापर करून अमेरिकेला व्यावसायिक तत्वावर डाळिंबाचे ३३६ बॉक्स म्हणजे १ हजार ३४४ किलो डाळिंब विमानाने अमेरिकेतील फ्लोरिडा या शहरात गुरुवारी निर्यात करण्यात आले. त्यामुळे डाळिंब निर्यातीस अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होण्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो.

सन २०१७-२०१८ मध्ये डाळिंबांच्या दाण्यांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरिकेने भारतातून डाळिंब आयातीस बंदी घातली होती. कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विकिरण सुविधा केंद्रात अमेरिकन निरीक्षकांच्या उपस्थितीत निर्यातीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानुसार डाळिंबाची निर्यात पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून गुरुवारी (दि.२५) करण्यात आली.

सकाळ

# सीताफळ निर्यातीसाठी मॅग्नेट योजनेअंतर्गत जागृती

## उपव्यवस्थापक महादेव बरडे : मानवलोकमध्ये गॅप सर्टिफिकेशन प्रशिक्षण

**अंबाजोगाई, ता. ३१ (बातमीदार)** : सीताफळांच्या निर्यातीसाठी मॅग्नेट योजनेअंतर्गत ग्लोबल गॅप सर्टिफिकेशनची जागृती करण्यात येत असल्याची माहिती लातूर पणन विभाग तथा मॅग्नेट पीआययूचे उपव्यवस्थापक महादेव बरडे यांनी दिली.

येथील मानवलोक सेवाभावी संस्थेच्या मुख्यालयात शेतकऱ्यांसाठी मंगळवारी (ता.२३) 'उत्तम कृषी पद्धती सीताफळ' म्हणजे ग्लोबल गॅप सर्टिफिकेशनचे प्रशिक्षण झाले. या प्रसंगी सीताफळ बागायतदार संघाचे रमेश निकस, शेतकरी गणेश गायकवाड, उपविभागीय कृषी अधिकारी एस. डी. शिनगारे, तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत वडखेलकर, मॅग्नेटचे प्रकल्प अधिकारी श्री. हतांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मानवलोकचे सहकार्यवाह लालासाहेब आगळे, मानवलोक कृषी विभाग प्रमुख इरफान शेख यांचीही उपस्थिती होती. यावेळी बरडे यांनी मॅग्नेट प्रकल्पांतर्गत विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली.

सीताफळ बागायतदार संघाचे रमेश निकस यांनी गटाने एकत्रित मार्केटिंग करण्याबाबत मार्गदर्शन केले. भाव आला तेव्हा शेतकऱ्यांकडे माल नसतो, असे सांगून गटाने एकत्रित येऊन जानेफळ पॅटर्ननुसार मार्केटिंग करण्याचे आवाहन निकस यांनी केले.



**अंबाजोगाई** : मानवलोकमध्ये झालेल्या सीताफळ उत्पादक मॅग्नेट योजनेंतर्गत प्रशिक्षणात उपस्थित मान्यवर, अधिकारी व शेतकरी.

तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत वडखेलकर यांनी सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. शेतकरी गणेश गायकवाड यांनी सीताफळ बहार व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. ग्राहकांचा विश्वास असलेले जागतिक मानांकन पद्धतीने प्रमाणीकरण करत ग्लोबल गॅप सर्टिफिकेशन केल्यास जगभरातील मार्केट सीताफळ विक्रीस उपलब्ध होईल, असा विश्वास इरफान शेख यांनी व्यक्त केला. या प्रशिक्षणास सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### ब्रँड विकसित करा

शेतकऱ्यांनी सीताफळ विक्री करताना आपला ब्रँड विकसित करावा. फळाचा उत्तम दर्जा राखावा, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी एस. डी. शिनगारे यांनी केले. बीडच्या बालानगर सीताफळाला मिळालेल्या जागतिक मानांकनाच्या मार्केटिंगमधील महत्त्वाबाबतही त्यांनी माहिती दिली

Aurangabad, Beed-Today
01/02/2024 Page No. 4

# बाजार समित्यांतून निवडणुका हद्दपार!

## केंद्राचा निधी मिळण्यासाठी नामनियुक्त समिती पाहणार कामकाज, मंत्री समिती घेणार निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आंतरराज्य तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारी महत्त्व असलेल्या बाजार समित्यांवर आता राज्य सरकारचे वर्चस्व राहणार आहे. या बाजार समित्यांमधील निवडणूक यापुढे संपुष्टात येणार असून नामनियुक्त संचालक मंडळ अस्तित्वात येणार आहे. केंद्र सरकारने पारित केलेल्या कायद्यानुसार या बाजार समित्यांना केंद्राकडून भरीव मदत केली जाणार असून कायद्यातील अटीनुसार या समित्यांना यापुढे नामनिर्देशित संचालक मंडळ असणार आहे. यात पुणे, मुंबई, नाशिकसारख्या बाजार समित्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे.

यासंदर्भात मंत्रीस्तरीय समिती लवकरच निर्णय घेणार आहे. बाजार समित्यांमधील निवडणुकाच रद्द झाल्याने राजकीय वर्चस्वापोटी होणारी चिखलफेक थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



पुणे, मुंबई, नाशिक यासारख्या मोठ्या बाजार समित्यांमध्ये आंतरराज्य तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार होत असतो. अशा बाजार समित्यांमध्ये जागतिक पातळीवरील सोयीसुविधा निर्माण करता याव्यात, यासाठी केंद्र सरकारने कायदादेखील मंजूर केला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नव्हती. राज्य सरकारने २०१६ मध्ये विधानसभेत कायदा पारित केला होता. मात्र, विधान परिषदेतून हा कायदा मागे घेण्यात आला. त्यावरील आक्षेपांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी एक मंत्रिस्तरीय समिती गठित केली होती. समितीच्या दोन ते तीन बैठकादेखील झाल्या. मात्र, त्यानंतर ही समिती थंड बस्त्यात गेली.

### राजकारणाला चाप

दरम्यान, निधी पुरविताना या बाजार समित्यांमध्ये यापुढे निवडणुका होणार नाहीत, अशी महत्त्वपूर्ण अट केंद्र सरकारने ठेवली आहे. राज्य सरकारने नियुक्त केलेले संचालक मंडळ बाजार समित्यांचा कारभार पाहणार आहे. संचालक मंडळाचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे मंत्री असतील. तर, उपाध्यक्ष म्हणून सहकार विभागातील अतिरिक्त निबंधक दर्जाचे अधिकारी नेमण्यात येणार आहेत. अन्य सदस्यांमध्ये सरकारने नियुक्त केलेले तज्ज्ञ तसेच अन्य प्रतिनिधी असतील. त्यामुळेच या बाजार समित्यांमधील निवडणुका हद्दपार होणार आहेत. त्यामुळे येथील राजकारणालाही चाप बसणार आहे. बाजार समितीमधील वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी होणारी राजकीय स्पर्धाही यामुळे संपण्याची चिन्हे आहेत.

> नामनियुक्त संचालक मंडळामुळे निर्णय प्रक्रिया अधिक सुलभ होईल. निवडून आलेल्या संचालक मंडळाप्रमाणेच हे मंडळ काम करणार असल्याने शेतकऱ्यांसाठी निर्णय घेताना कुठलाही फरक नसेल. बाजार समित्या एक प्रकारे निमशासकीय संस्थाच आहेत. त्यांना सरकारी जागा दिली गेली असून त्यांचा विकासदेखील राज्य सरकारमार्फत केला गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फायद्यासाठीच निर्णय घेतला जाणार आहे.
>
> **- केदारी जाधव**, पणन संचालक, पुणे

### संख्या किती हे समिती ठरविणार

राज्य सरकारने ही समिती आता नव्याने पुनर्गठीत केली असून त्यात महसूल, पणन, कृषी व सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्याचे मुख्य सचिव, सहकार व कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव हे सदस्य असतील. ही समिती राज्यातील दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढावा असलेल्या बाजार समित्यांचा आढावा घेणार आहे. त्यानुसार केंद्र सरकारकडून दिली जाणारी मदत किती बाजार समित्यांना द्यावी याची संख्या ही समिती ठरविणार आहे. या निधीतून पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या करण्यात येणार आहेत. सध्या बाजार समित्यांना स्वनिधीतून विकासाला अनेक मर्यादा येत आहेत. जागतिक दर्जाची सुविधा पुरविताना स्वतंत्र निधीची गरज असल्याने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. निधी मिळण्यास सुरुवात झाल्यानंतर बाजार समित्यांना साठवणुकीसाठी गोडाऊन, अंतर्गत रस्ते, ऑनलाइन सुविधा पुरविण्यात येणार आहेत. या सुविधांमुळे शेतमालाची वाहतूक वेगवान होईल तसेच साठवणूक क्षमता वाढल्यामुळे गुणवत्ता टिकवण्यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. केंद्र सरकारच्या ई-नाम योजनेमुळेच थेट व्यापारात आतापर्यंत २६ टक्के वाढ झाली आहे. त्याचा शेतकरी व ग्राहकांना फायदा झाला आहे.